सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक-अ–मध्य उप-विभाग

वर्ष १, अंक ४३] सोमवार, डिसेंबर १४, २००९/ अग्रहायण २३, शके १९३१ [पृष्ठे १८, किंमत : रुपये २०.००

असाधारण क्रमांक ७३

प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) वृक्षसंवर्धन
आणि जतन अधिनियम, १९७५

### नगर विकास विभाग

शिबीर कार्यालय, नागपूर - ४४०००१, दिनांक : १४ डिसेंबर, २००९.

क्रमांक- टिपीबी-४३०६/२४३३/प्र.क्र.१९३/२००६/नवि-११

महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) वृक्ष संरक्षण आणि संवर्धन अधिनियम, १९७५ (महाराष्ट्र १९७५ चा ५४) च्या कलम २२, उपकलम (१) याद्वारा प्रदान करण्यांत आलेल्या शक्तींचा वापर करुन महाराष्ट्र शासन यापुढील नियम अधिनियमात उल्लेखिलेली कार्ये पार पाडण्यासाठी करीत आहे; उक्त नियम उपकलम (१) नुसार आवश्यक असल्याप्रमाणे पूर्वीच प्रसिध्द केलेले आहेत.

१. या नियमांना महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) वृक्ष संरक्षण आणि संवर्धन नियम, २००९ असे संबोधता येईल.

२. या नियमात, संदर्भानुसार अन्य अर्थ अपेक्षित नसेल तर :-

(१) "अधिनियम" याचा अर्थ, महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) वृक्ष संरक्षण आणि संवर्धन अधिनियम, १९७५;

(२) "प्रपत्र" याचा अर्थ, या नियमांच्या सोबत जोडलेले प्रपत्र;

(३) "अनुसूची" याचा अर्थ, या नियमांच्या सोबत जोडलेली अनुसूची;

(४) "कलम" याचा अर्थ, या अधिनियमाचे कलम;

(५) या नियमात वापरलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना अधिनियमात नमूद केल्याप्रमाणे अनुक्रमे अर्थ असतील.

३. वृक्ष प्राधिकरणावर अशासकीय संस्थेचा प्रतिनिधी म्हणून नियुक्त होण्यास नामनिर्देशित व्यक्ती शासनाच्या सामाजिक वनीकरण विभागाकडील नोंदणीकृत अशासकीय संस्थेची सक्रिय सदस्य असेल; तसेच तिला वृक्ष लागवड, वृक्ष संवर्धन आणि वृक्ष संरक्षण इत्यादी यामध्ये रुची असेल; आणि तसेच तिला या क्षेत्रातील किमान १० वर्षांचा समृध्द अनुभव प्राप्त असावा.

४. वृक्ष प्राधिकरणाच्या बैठकचालना संदर्भात खालील तरतुदी लागू असतील, जसे -

(१) महानगरपालिका क्षेत्रातील वृक्ष प्राधिकरणांसाठी महानगरपालिका आयुक्त हे वृक्ष प्राधिकरणाचे अध्यक्ष असतील, परंतु असे की, अध्यक्षांच्या अनुपस्थितीत, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्तांच्या दर्जापेक्षा कमी नाही आणि महानगरपालिका आयुक्तांनी लेखी प्राधिकृत केलेला असा अधिकारी बैठकीचे अध्यक्षस्थान स्वीकारील;

(२) अन्य स्थानिक नागरी प्राधिकरणांसाठी कलम (३) च्या उपकलम (२) च्या तक्त्यामध्ये वर्णन केल्याप्रमाणे बैठकीचे अध्यक्षस्थान स्वीकारील;

(३) वृक्ष प्राधिकरणाची बैठक ४५ दिवसांमध्ये किमान एकदा आणि सामान्यतः वृक्ष प्राधिकरणाच्या मुख्यालयी घेण्यात येईल;

परंतु असे की, अध्यक्ष वृक्ष प्राधिकरणाच्या अधिकारक्षेत्रातील कोणत्याही ठिकाणी बैठक घेण्यास निदेश देऊ शकेल.

(४) "वृक्ष अधिकारी" वृक्ष प्राधिकरणाचा सदस्य-सचिव असेल आणि सदस्य-सचिव या नात्याने बैठकीची सूचना बजावेल;

(५) वृक्ष प्राधिकरणाच्या बैठकीसाठी एक तृतीयांश सदस्यांची उपस्थिती गणपूर्ती समजली जाईल;

परंतु असे की, जर नेमून दिलेल्या दिवशी आणि वेळी बैठकीस आवश्यक गणपूर्ती नसेल तर बैठक ३० मिनिटांसाठी तहकूब केली जाईल आणि तहकुबीनंतरच्या बैठकीस गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही.

(६) अध्यक्षांना निर्णायक मत असेल.

(७) ठरावाची सूचना किमान तीन दिवस आगाऊ देता येईल.

(८) अल्पसूचनेद्वारा हरकतीचा मुद्दा तात्काळ उपस्थित करता येईल आणि त्या प्रकरणी अध्यक्षांचा निर्णय अंतिम असेल आणि त्याचा अंतर्भाव बैठकीच्या इतिवृत्तात करता येईल.

(९) अध्यक्ष अन्य आनुषंगिक बाबींवर निर्णय घेतील.

५. वृक्ष प्राधिकरणाच्या सदस्याचे सदस्यत्व संपुष्टात येईल, जर तो -

(१) वृक्ष प्राधिकरणाच्या सलग तीन बैठकांना उपस्थित राहण्यात कसूर करील;

(२) अशासकीय संस्थेतील त्याचे सदस्यत्व संपुष्टात आल्यास किंवा ज्या नागरी स्थानिक प्राधिकरणाचे प्रतिनिधित्व करतो त्याचे सदस्यत्व संपुष्टात आल्यास;

६. प्रपत्र- " अे" मध्ये नमूद वृक्ष प्राधिकरणाच्या विद्यमान क्षेत्रातील वृक्षांची गणना पार पाडील.

७. प्रपत्र-"बी" मध्ये नमूद वृक्ष प्राधिकरणाच्या अधिकारक्षेत्रातील प्रत्येक भूखंडासाठी वृक्ष आणि त्याचे प्रकार याचे मानक विहित करील.

८. अनुसूची-१ मध्ये निश्चित केल्यानुसार वृक्ष प्राधिकरण रस्त्यालगत, सार्वजनिक बागा व बगीचे, नद्या व तलावाकाठी किंवा समुद्रकिनारी किंवा टेकड्या किंवा सार्वजनिक स्थळांवर वृक्ष लागवड व त्याची जोपासना करेल आणि परिरक्षण करेल.

९. वृक्षतोडीसाठी विनंती अर्ज प्रपत्र- "सी" प्रमाणे असेल. प्रपत्र-"डी" मधील प्रतिज्ञापत्र/बंधपत्रासह सादर करावा.

१०. वृक्ष प्राधिकरणाने वृक्ष तोडण्यासाठी दिलेल्या परवानग्यांचे अहवाल प्रपत्र- "इ" मध्ये नमूद केलेल्या नमुन्यात जतन करेल व त्यामध्ये नमूद केल्यानुसार त्याबाबतची नोंदवही ठेवेल.

११. वृक्ष अधिका-याच्या मते कलम ७ मध्ये विहित केलेल्या मानक / प्रमाणकापेक्षा कुठल्याही जमिनीवरील वृक्षसंख्या पुरेशी नसल्यास, वृक्ष प्राधिकरण वृक्षारोपण करण्यासाठी भूखंडाच्या प्रत्येक मालकास आणि भोगवटादारास प्रपत्र- "एफ" नुसार नोटीस बजावेल व प्रपत्र-"एफ" नुसारचा नोटीसप्राप्त मालक किंवा भोगवटादारास प्रपत्र " जी " मध्ये पूर्तता अहवाल सादर करावा लागेल.

१२. पाऊस, आग, वीज पडल्याने, मुसळधार पावसाने जेथे वृक्ष पडले असतील / नष्ट झाले असतील तर वृक्ष अधिकारी प्रपत्र- -"एच" नुसार जमीन मालकास किंवा भोगवटाधारकास वृक्षारोपण करणेबाबतची नोटीस बजावू शकेल.

१३. अर्जदाराने वृक्ष दत्तक घेणे अनुज्ञेय असेल तेथे वृक्षांचे प्रकार, वृक्षांचे तपशील इत्यादी दत्तक घ्यावयाची झाडे याची माहिती देऊन प्रपत्र-"आय" मध्ये नमूद केल्याप्रमाणे अर्ज करावा लागेल.

१४. अनुसूची दोन मध्ये नमूद केलेल्या वृक्ष प्राधिकरणाच्या वर्गवारीनुसार विनिर्दिष्ट किमान वृक्षांची लागवड वृक्ष प्राधिकरण प्रतिवर्षी वृक्ष लागवड करेल. अशा लागवड केलेल्या वृक्षांची आकडेवारी वृक्ष प्राधिकरणाच्या वार्षिक वृक्षारोपण योजनेत प्रतिबिंबित होतील आणि अशा योजना दहा वर्षांच्या यथार्थदर्शी योजनेशी सुसंगत राहील.

## अनुसूची-१

### कलम ७(एच)

### रस्त्याच्या बाजूने व विविध वापराखाली लागवड करावयाच्या वृक्षांच्या संख्येबाबतची प्रमाणके

| स्थान | | वृक्षांची किमान संख्या |
|---|---|---|
| रस्त्याच्या बाजूने | रस्त्याची रुंदी | |
| | २४ मी. आणि अधिक | प्रत्येक १० मी. अंतरावर १ वृक्ष व (मेडीयनच्या दोन्ही बाजूला सोईनुसार हेजेस) |
| | १२ मी. ते २४ मी. | रस्त्याच्या दुतर्फा प्रत्येकी १० मी. अंतरावर १ वृक्ष. |
| | ६ मी. ते १२ मी. | प्रत्येकी २० मीटर अंतरावर १ वृक्ष. |
| बागा, समुद्र किनारे, टेकडी उतार, हरितक्षेत्रे, हरितपट्टे, नदी किनारे, पाणथळे जागांचे किनारे | . . | १ वृक्ष प्रती १० चौ.मी. क्षेत्र. |
| बगीचा | | १ वृक्ष / २० चौ.मी. |
| अभिन्यासातील खुल्या जागा | | १ वृक्ष / ५० चौ.मी. |
| क्रिडा प्रेक्षागार, लघु क्रिडा प्रेक्षागार, क्रिडांगणे, लहान मुलांच्या खेळण्यांच्या जागा, विकास योजनेतील खुल्या जागा | | १ वृक्ष / प्रत्येकी १०० चौ.मी. सुविधा क्षेत्राच्या |
| केंद्रशासन / राज्य शासन / निमशासकीय / कॉर्पोरेट कार्यालये/ संस्थीय | | १ वृक्ष/भूखंडाच्या १०० चौ.मी. क्षेत्रासाठी. |

(१) वरील प्रमाणकानुसार वृक्षांची लागवड करताना, स्थानिक मृदू हवामान तसेच स्थानिक उपलब्ध वृक्षांच्या जाती विचारात घेऊन अनुरुप असलेल्या संवर्गातील वृक्षांची निवड करण्याची काळजी घ्यावी.

(२) वृक्षांना शिंपणासाठी, लगतच्या बगीचांसारख्या सार्वजनिक जागेत कूपनलिकांव्दारे प्राधान्याने पाणी उपलब्ध करावे. अशा स्थळांची योग्य निगा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने अशा कूपनलिका किंवा विद्यमान कूपनलिकांचे पुनर्भरण संयुक्तीक वर्षा जलसंवर्धन यंत्रणेनुसार करावी.

(३) नैसर्गिक आपत्तीमध्ये तग धरुन राहण्याच्या दृष्टीने रस्त्याच्या कडेला वृक्षारोपण करताना ज्यांची मुळे खोलवर जाणारी असतील, अशा वृक्षांची निवड करावी.

(४) लॅण्डस्केपच्या डिझाईनमध्ये लवचिकता अपेक्षित असली तरी प्रमाणकानुसार लागवड करावयाच्या वृक्षांच्या किमान संख्येबाबतची तरतुद कठोरपणाने पाळणे आवश्यक आहे.

## अनुसूची-२

### कलम १६

वृक्ष प्राधिकरण खालीलप्रमाणे प्रत्येक वर्षी कमीत कमी संख्येची झाडे लावेल आणि त्याचा वार्षिक वृक्षारोपणाच्या नियोजनामध्ये समावेश असेल. असा वार्षिक आराखडा पुढील १० वर्षांच्या भविष्यातील नियोजनाशी सुसंगत असेल.

| प्राधिकरण | प्रतीवर्षी वृक्षारोपण करावयाच्या किमान वृक्षांची संख्या |
|---|---|
| महानगरपालिका/ विशेष नियोजन प्राधिकरण / नवनगर विकास प्राधिकरण | १०,००० |
| नगरपरिषदा- | |
| अ वर्ग | ५,००० |
| ब वर्ग | ३,००० |
| क वर्ग | १,००० |

वार्षिक वृक्षरोपणासाठी विशिष्ट अर्थसंकल्पीय तरतुद करणेत यावी.

## प्रपत्र- " अे "

### कलम ७(बी) : वृक्ष गणनेसाठीचे प्रपत्र

दिनांक :

(१) नगर भूमापन क्रमांक :

(२) प्रभाग क्रमांक :

(३) मालक/भोगवटा धारकाचे नांव :

(४) भूखंडाचे क्षेत्र (चौ. मी.)

| झाडाचा अनु-क्रमांक | झाडाचे वर्गीकरण | | | सर्व-साधारण नांव | वनस्पती शास्त्रीय नांव | घेरा (सें.मी.) | ऊंची (मीटर) | झाडाची सद्य:स्थिती | वृक्ष-रोपणाची व्याप्ती | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | फळझाडे | शोभिवंत झाडे | इतर (तपशील) | | | | | | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |

प्रगणकाचे नांव व सद्य:स्थिती. मालक/भोगवटा धारकाचे नांव व स्वाक्षरी

**तळटीप :** (१) १० सें. मी. पेक्षा जास्त घेर व ३ मी. पेक्षा जास्त उंची असेल अशा वृक्षांची गणना करण्यात यावी.

(२) प्रमाणकानुसार अतिरिक्त वृक्षांची लागवड करावयाच्या संख्येबाबतचा उल्लेख वृक्षरोपणाची व्याप्ती या स्तंभात करण्यात यावा.

## प्रपत्र- " बी "

### कलम ७ (ब) नुसार विहित नमुना

दिनांक:

प्रत्येक भूखंडावर लागवड करावयाच्या वृक्षांची संख्या व प्रकार विषद करणारी प्रमाणके

(१) मालकांचे/ भोगवटाधारकांचे नांव

(२) नगर भूमापन क्र./भूखंड क्र. (पत्ता)

(३) भूखंडाचे क्षेत्र (चौ.मी.)

| १ वृक्ष प्रती १०० चौ.मी. या दराने लागवड करावयाच्या वृक्षांची | | विद्यमान वृक्षांची संख्या | वृक्षांचा अनुक्रमांक | कमतरता असलेल्या वृक्षांची (४-५) संख्या ज्याची लागवड करणे आवश्यक आहे. | अभिप्राय: वारा, आग, वीज, वादळी पाऊस यामुळे झाडं पडले आहे काय ? |
|---|---|---|---|---|---|
| संख्या | प्रकार | | | | |
| (४) | | (५) | (६) | (७) | (८) |

## प्रपत्र- " सी "

### कलम ८ (२) खालील अर्ज

दिनांक :

प्रति,

वृक्ष प्राधिकरण

**विषय** : वृक्षतोड/वृक्षांच्या पूनर्रोपणासाठी परवानगी
............................या प्रस्तावित विकास कामाखालील.

मी, निम्नस्वाक्षरीकार वृक्ष तोडणीबाबत अर्ज करतो. ज्याचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे :--

(१) अर्जदाराचे नांव :

(२) नगर भूमापन क्रमांक :

| प्रभाग क्रमांक | अनुक्रमांक | विद्यमान झाडांची संख्या | तोडण्याच्या/पुनर्रोपण करावयाच्या प्रस्तावित झाडांची संख्या | शिल्लक ठेवावयाच्या झाडांची संख्या | वृक्षतोडणीची कारण |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |

झाडांची स्थाने दर्शविणारा नकाशा मी यासोबत जोडत आहे. प्राधिकरणाचे निदेशानुसार विहित कालावधीमध्ये करावयाची ......... वृक्षांची लागवड/पुनर्रोपण व देखभाल याबाबतची हमी मी घेत आहे. त्याकरिता वृक्ष प्राधिकरणाकडे आवश्यक ती सुरक्षा अनामत रक्कम भरण्यास मी तयार आहे.

आपला विश्वासू,

(मालक/भोगवटा धारक)

अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे---

(१) जागेचा मालकी हक्कासंबंधी कागदपत्रे

(२) मंजूर बांधकाम नकाशा, असल्यास

(३) तोडावयाच्या वृक्षांचे फोटो, शक्य असल्यास

(४) कलम ११ (२), खालील हमीपत्र

## प्रपत्र- " डी "

### कलम ११(२)खालील हमीपत्र

(अर्जा सोबत सादर करणे आवश्यक)

दिनांक:

प्रति,

वृक्ष अधिकारी,

----------------------------

मी लिहून देतो की, अधिनियमाच्या कलम ८/९/१० खालील आदेशाला मी बांधील राहिन. या पुढे असे लिहून देतो की, मी वृक्षांचे योग्यत-हेने रोपण करेन, अस्तित्वातील सर्व तसेच नवीन लावलेल्या रोपांचे रक्षण करीन. मी, झाडांच्या रोपना / पुनर्रोपणाच्या दिनांकापासून पहिल्या ३ वर्षासाठी नित्य नेमाने सहामाही अहवाल सादर करीन. तसेच आदेशानुसार मी, सुरक्षा अनामत रक्कम भरण्यास बांधील राहिन. कलम ८ व ९ च्या आदेशाचे माझ्याकडून उल्लंघन झाल्यास मी भरलेली सुरक्षा अनामत रक्कम रद्द होईल, याची मला जाणीव आहे.

आदेशातील बाबींचे माझ्याकडून उल्लंघन झाल्यास अधिनियमातील तरतुदींनुसार माझ्यावर कायदेशीर कार्यवाही होईल याची मला जाणीव आहे.

मालक/ भोगवटादार

## प्रपत्र- " ई "

### कलम ८(३)(बी)

वृक्ष प्राधिकरणाने .................. ते .................. या कालावधीत दिलेल्या परवानगीबाबतचा अहवाल

| प्रभाग | मंजूर परवानग्यांचे अनुक्रमांक | जमीन मालकाचे/ भोगवटा-धारकांचे नांव | स्थान | अर्जाचा क्रमांक आणि दिनांक | तोडण्या-साठी परवानगी दिलेल्या वृक्षांची संख्या | पुनर्रोपणा-साठी परवानगी दिलेल्या वृक्षांची संख्या | वृक्षतोड/ पुनर्रोपणा-साठी अनुज्ञेय केल्याच्या बदल्यात अतिरिक्त वृक्ष रोपन करावयाची संख्या | कारण | अनामत रक्कम प्राप्त | परवानगी दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |

वृक्ष प्राधिकरण अध्यक्षांची स्वाक्षरी

प्रति,

नागरी स्थानिक प्राधिकरण

**प्रपत्र- " एफ "**

**कलम ९(१), ९(२) अन्वये आदेश**

प्रति,

-----------------------------

-----------------------------

**विषय :** महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) वृक्ष संरक्षण व संवर्धन अधिनियम,१९७५
चे कलम ७(सी) नुसार वृक्षारोपन.

**संदर्भ:** (१) वृक्ष अधिकारी यांचे ····················चे निरिक्षण

(२) आपला दिनांक················ रोजीचा अर्ज.

आपल्या भूखंडाचे क्षेत्र················चौ.मी. असल्याने १ वृक्ष /·········चौ.मी. या दराने आपणास·········वृक्षांची लागवड करावयाची आहे. तथापि, सदर जागेचे स्थळनिरिक्षणानुसार सदर जागेवर एकूण ·········वृक्ष विद्यमान असल्याचे आढळून आले आहे. याचा विचार करता, आपणास कळविण्यात येत आहे की, आपणांस················या स्थळातील आपल्या जागेवर ·········एवढ्या अतिरिक्त वृक्षांचे रोपण या आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत करावयाचे आहे.

आपणांस असेही कळविण्यात येत आहे की, प्रस्तुत आदेशाचा कार्यपालन अहवाल वृक्ष प्राधिकरणास त्वरीत सादर करावा. या वृक्षरोपण करावयाच्या वृक्षांच्या योग्य जतनाबाबतचे हमीपत्र सादर करण्याची आपणास विनंती करण्यात येत आहे. या आदेशाचे पालन न झाल्यास प्रतिवृक्ष रु.५०००/- चा दंड आकारण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. तसेच या आदेशाचे पालन न केल्यास अधिनियमानुसार आपणाविरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

आपला विश्वासू,

सही/-

( वृक्ष अधिकारी )

(वृक्ष प्राधिकरणाचा शिक्का)

## प्रपत्र- "जी"

कलम ९(२)

दिनांक :

### जमिनीचे मालक/भोगवटाधारक यांनी कलम ८/९/१० अन्वये, सादर करावयाचा अनुपालन अहवालाचा नमुना

| वृक्ष अधिकारी यांनी कलम ९ (१) अन्वये दिलेल्या आदेशाचा दिनांक | कलम ७(ग) व कलम १० (१) आणि कलम ९(१) नुसारच्या आदेशात विहित केलेल्या मानकानुसार आवश्यक वृक्षांची संख्या | अस्तित्वातील वृक्षांची संख्या | पुनर्रोपण करणे आवश्यक असलेल्या वृक्षांची संख्या | वृक्ष लागवडीचे ठिकाण | मालकाने करावयाचे अनुपालन | | | | कार्यपालनाचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | पुनर्रोपण केलेल्या वृक्षांची संख्या | अतिरिक्त पुनर्रोपण केलेल्या वृक्षांची संख्या | अस्तित्वातील वृक्षांची संख्या | एकूण वृक्षांची संख्या | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |

या वृक्षरोपण केलेल्या वृक्षांचे योग्य जतन करण्याची मी जबाबदारी स्वीकारतो.

वरीलप्रमाणे वृक्षारोपन केलेली वृक्षे योग्यप्रकारे जतन करण्यात येत आहेत.

मालक /भोगवटाधारकाचे नांव व सही

भूखंड क्रमांक/सर्व्हे क्रमांक

स्थळ :

प्रभाग क्रमांक :

प्रपत्र-" एच "

सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) वृक्षसंवर्धन व जोपासना अधिनियम, १९७५ च्या कलम १०(१) व कलम ७ (सी) सह

विषय : न.भू.क्रमांक.................... या.................... यांच्या मालकीच्या
जागेवरील वृक्ष नष्ट / पडलेबाबत.

जागेच्या स्थळनिरिक्षणाचे वेळेस निम्नस्वाक्षरीकाराच्या कर्मचारीवर्गास असे निदर्शनास आले आहे की, वादळ / आग / वीज / वादळी पाऊस यामुळे.................... वृक्ष पडले/ नष्ट झाले आहेत. या कारणामुळे महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) वृक्षसंवर्धन व जोपासना अधिनियम,१९७५ च्या कलम ७ (सी) अन्वये, आपल्या भूखंडावर.................... संख्येच्या वृक्षांची कमतरता आहे.

त्यामुळे, आपल्याला ही नोटीस मिळाल्यापासून ९० दिवसांचे आत भूखंडावर.................... संख्येच्या वृक्षांची लागवड करणे आवश्यक राहील. या नोटीसीच्या अनुषंगाने आपल्या काही सूचना/ हरकती असल्यास, त्या आपण दिनांक.................... रोजी अथवा त्यापूर्वी निम्नस्वाक्षरीकारांकडे दाखल करू शकता. वरीलप्रमाणे या मुदतीत सूचना/ हरकती दाखल न केल्यास ही सूचना अधिनियमाच्या कलम १०(१) अन्वये, अंतिम आदेश म्हणून समजण्यात येईल.

आपला विश्वासू,

( वृक्ष अधिकारी )

प्रति,

--------------------

--------------------

प्रपत्र-" आय "

कलम १२ अन्वये अटी आणि शर्ती

(रु.२०/- चे स्टॅम्पपेपरवर करावयाच्या करारनाम्यात नमूद करणे)

वृक्ष दत्तक घेणे हे खालील अटी व शर्तींना अधीन राहून करावे.

(१) वृक्षांचे योग्यप्रकारे जतन करणे आवश्यक राहिल.

(२) दत्तक वृक्षांच्या जोपासने / संरक्षणेसाठी संस्था/ कंपनी/ ट्रस्ट / वैयक्तीक व्यक्ती हे सर्वस्वी जबाबदार राहतील.

(३) एक वर्षापेक्षा कमी कालावधीचे कोणतेही वृक्ष दत्तक देणेत येऊ नयेत.

(४) वृक्ष दत्तक कालावधीत सर्व अटी व शर्तीचे पालन होईल याबाबतचे हमीपत्र संबंधित संस्थेने द्यावे.

| अर्जदार | दत्तक घ्यावयाच्या वृक्षांसंबंधी माहिती | | | | दत्तक घ्यावयाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | संख्या | प्रकार | अंदाजे वय | स्थान | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| वैयक्तीक / कॉर्पोरेट बॉडी / संस्था / ट्रस्ट / कंपनी | | | | | |

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

**( नो. र. शेंडे )**

उप सचिव, महाराष्ट्र शासन.

URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Camp Office, Nagpur-440 001, Dated 14th December, 2009.

MAHARASHTRA (URBAN AREAS) PROTECTION AND PRESERVATION OF TREES ACT, 1975.

No. TPB – 4306/2433/CR-193/2006/UD-11:

In exercise of the powers conferred under sub-section (*1*) of Section 22 of the Maharashtra (Urban Areas) Protection and Preservation of Trees Act, 1975 (Mah. XLIV of 1975), the Government of Maharashtra hereby makes the following rules to carry out the purposes of the Act, the same having been previously published, as required by the said sub-section (*1*), as follows:—

1. These rules may be called the Maharashtra (Urban Areas) Protection and Preservation of Trees Rules, 2009 ;

2. In these rules unless the context otherwise required,—

(i) "Act" means the Maharashtra (Urban Areas) Protection and Preservation of Trees Act, 1975;

(ii) "Form" means form appended to these rules;

(iii) "Schedule" means Schedule appended to these rules;

(iv) "Section" means section of the Act;

(v) The words and expressions used but not defined herein shall have their respective meaning as assigned to them in the Act.

3. For being nominated as a representative of non-official organisation on the Tree Authority, the person shall be an active member of a non-official organization registered with the Social Forestry Department of the Government; shall have an interest in tree plantation, tree conservation, tree protection, etc., and shall possess a rich experience of at least ten years in the field.

4. With regard to the conduct of meetings of the Tree Authority, the following provisions shall apply, namely :—

(i) in respect of Tree Authority in a Municipal Corporation Area the Municipal Commissioner shall be the Chairman of the Tree Authority :

Provided that, in the absence of Chairman, an officer not below the rank of Additional Municipal Commissioner, as is authorised by the Municipal Commissioner, by writing for the meeting may preside over the meeting;

(ii) in respect of other Urban Local Authorities, the Chairman as is described in the Table to sub-section (*2*) of Section 3 of the Act shall preside over the meeting;

(iii) the meeting of the Tree Authority shall be held at least once in forty-five days and shall ordinarily be held at the headquarters of the Tree Authority :

Provided that, the Chairman may direct the meeting to be held at some other place within the jurisdiction of the Tree Authority :

(iv) The Tree Officer shall be Member-Secretary of the Tree Authority and in his capacity as the Member-Secretary shall serve the notice for the meeting ;

(v) One-third of the members of the Tree Authority shall form the quorum for the meeting :

Provided that, in case there is no required quorum at the time and date specified for the meeting, the meeting shall be adjourned for thirty minutes and thereafter no quorum shall be required for such adjourned meeting ;

(vi) The Chairman shall have a casting vote ;

(vii) Notice of motion shall be given at least three days in advance ;

(viii) Point of order may be raised on the spot with short notice and the decision of the Chairman in that cases shall be final and the same shall be included in the minutes of the meeting ;

(ix) The Chairman shall decide other relevant matters.

5. A member shall cease to be a member of the Tree Authority if,

(i) he fails to attend three consecutive meetings of the Tree Authority, or

(ii) he ceases to be a member of the non-official organization or the Urban Local Authority to which he represents.

6. The Tree Authority shall carry out the census of the existing trees within the jurisdiction in Form- 'A'.

7. The Tree Authority shall prescribe the standard specifying the tree and type of trees which each plot of land shall have, in Form - 'B'.

8. The trees to be planted and maintained along with the roads in public parks and gardens and on the banks of rivers or lakes or seashores or hills or public places shall be as are specified in Schedule - I.

9. An application for felling of trees shall be made in Form - 'C' and shall be submitted along with an Undertaking in Form- 'D'.

10. The Tree Authority shall maintain the report of permissions granted for felling of trees in the Register in Form - 'E'.

11. If in the opinion of the Tree Officer, the number of trees in any land is not adequate, according to the standards prescribed under section 7, the Tree Authority shall cause the notice for plantation of trees on every owner and occupier of the plot in Form - 'F'. The owner or occupier to whom the notice in Form- `F' is served upon, shall submit the report of compliance in Form - 'G'.

12. Where any tree is fallen or destroyed by rain, fire, lightening or torrential rain, the Tree Officer may require the owner or occupier of the plot to plant trees by notice in Form - 'H'.

13. In case adoption of trees is permitted, the Applicant shall submit the application mentioning the details of the tree, type of trees, etc., trees to be adopted in Form - 'I'.

14. The Tree Authority shall every year plant the minimum number of trees as are specified against the category of Tree Authorities in Schedule - II. Such plantation shall be reflected in the Annual Tree Plantation Plan of the Tree Authority and such plan shall be consistent with ten years' perspective plan.

## SCHEDULE-I

### Section 7(h)

Norms for number of trees to be planted along roads and under various user etc.

| Location | | Minimum number of trees. |
|---|---|---|
| Along the road | Width of the road | |
| | 24 metres and above. | One tree at 10 m. interval & suitable hedge on both the sides of median, if possible. |
| | 12 metres to 24 metres | One tree at 10 m. interval on both the sides. |
| | 6 metres to 12 metres | One tree at 20 m. interval. |
| Parks, Sea-shores, Hill slopes, Flowing Greens, Green Belts, Riverside, Bank of Water Body. | | One tree/ 10 sq.m. area |
| Gardens | | One tree/ 20 sq.m. |
| Layout Open Spaces | | One tree/50 sq.m. |
| Stadium, Mini Stadium Playgrounds, Tot lots, Development Plan Open Spaces. | | One tree/100 sq.m. of area of such amenity. |
| Central / State Govt./ Semi-Govt./ Corporate Offices/ Institutions. | | One tree/ 100 sq.m. of plot area. |

(1) While planting the adequate number of trees as per the above norms, care shall be taken to select the species suitable to the local soil strata, the climate and the space available.

(2) Water, if can be made available by taking bores in the very public spaces like gardens etc., the same shall be done on priority. Recharging of such bores or existing bores by appropriate Rain Water Harvesting system, shall be provided for in the interest of proper maintenance and up-keep of such spaces.

(3) As regards road-side tree plantation, plants having deep roots shall be preferred to sustain the natural calamity.

(4) Though flexibility in the design of land-scape is anticipated, required number of trees as per the norms shall be strictly adhered to.

## SCHEDULE-II

### Section 16

### Preparation of Annual Tree Plantation Plan

The Tree Authority shall plant the minimum number of trees as specified below every year and the same shall be reflected in its Annual Tree Plantation Plan. Such Annual Plan shall be in consistent with the 10 year perspective plan.

| Authority | Minimum number of trees to be planted every year |
|---|---|
| Municipal Corporations/Special Planning Authorities/ New Town Development Authorities | 10,000 |
| Municipal Councils— | |
| A Class | 5,000 |
| B Class | 3,000 |
| C Class | 1,000 |

A specific budget shall be allocated for this Annual Tree Plantation.

## FORM –"A"

### Section 7(*b*)

### Format for Census of Trees

Date :

(1) City Survey No.

(2) Ward No.

(3) Name of the owner/occupier

(4) Area of the plot (Sq.m.)

| Sr.No. of the Tree | Category of the Tree | | | Common Name | Botanical Name | Girth (cm) | Height (m) | Present condition of the tree | Scope for plantation | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Fruit | Ornamental | Others (specify) | | | | | | | |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) | (9) | (10) | (11) |

Name & Signature of Enumerator. Name & Signature of Owners/Occupiers

*N.B.* : (1) Census shall be carried out in respect of trees having more than 10 cm. girth and 3 metre of height.

(2) In the column "Scope for plantation", mention shall be made regarding additional number of trees required to be planted as per the norms.

## FORM—"B"

### Format under Section 7(*c*)

Date :

Standards specifying the number of trees and types of trees to be planted on each plot.

(1) Name of the owner/occupier

(2) C.T.S.No./Plot No. (Address)

(3) Area of the plot (sq.mt.)

| No.of trees to be planted @ 1 tree for 100 sq.m. | | Number of trees existing | Sr. No. of the tree | Deficient number of trees (4 – 5) required to be planted | Remarks : Whether the tree is fallen due to wind/fire/lightening/ torrential rain *etc.* |
|---|---|---|---|---|---|
| No. Type | (4) | (5) | (6) | (7) | (8) |

## FORM –"C"

### Application under Section 8(2) :

Date :

To,

Tree Authority,

____________

*Sub* : Permission for cutting/transplanting the trees.
coming in the work of proposed __________.

I, the undersigned apply for cutting of the trees. The details are given below.

(1) Name of the applicant :

(2) City Survey No./Survey No.

| Ward No. | Sr. No. | Existing Number of Trees | Proposed Number of trees to be cut down / Transplanted | Balance number of trees to be retained | Reasons for cutting of the trees |
|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |
| | | | | | |

I enclose herewith plan showing the position of trees. I undertake to plant/ transplant and maintain _____ trees as per authority's direction and also within stipulated time. I am ready to pay the required security deposit for the same to the Tree Authority.

Yours faithfully,

(Owner/Occupier)

Documents to be submitted along with this application.

(1) Property ownership of the land.

(2) Approved building plan for construction, if any.

(3) Photographs of the trees, to be cut, if possible.

(4) Undertaking required under Section 11(2).

# FORM – "D"

## Undertaking under Section 11(*2*)
## (to be submitted alongwith the application)

To,

Date :

The Tree Officer,

____________________.

I hereby undertake to abide by the orders issued under Sections 8/9/10 of the Act. I further undertake to plant the trees properly and preserve all existing as well as newly planted trees in proper manner. I also undertake to furnish 6-monthly report for the first 3 years from the date of plantation/transplantation. I also undertake to pay security deposit according to the orders and I am aware that necessary security deposit shall get forfeited in case of non-compliance of the order under Section 8/9.

I am also aware that failure to comply will also attract the legal action as per the provisions of the Act.

Owner/Occupier.

# FORM – "E"

## Section 8(*3*)(*b*)

Report of Permission granted by the Tree Authority for the period from .......... to ..........

| Ward | Sr. No. of Permi-ssions granted | Name of the owner/ occupier | Location | Application No. and date | Trees permitted to fell | Trees permitted to transplant | Trees to be additionally planted in lieu of trees allowed to be cut/ transplanted | Reason | Deposit received | Date of Issuance of per-mission |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) | (9) | (10) | (11) |

Signature of Chairman of the Tree Authority.

To,

Urban Local Authority.

## FORM – "F"

### Order under Section 9(*1*) 9(*2*)

To,

________________________

________________________

**Sub** : Plantation of trees under Sec.7(*c*) of Maharashtra (Urban Areas)Protection & Conservation of Trees Act, 1975

**Ref** : (1) Inspection of Tree Officer dated———.

(2) Your application dated————.

The area of your plot being ——— sq.m., you are supposed to plant ——— trees at the rate of 1 tree per —————sq.m. However, during inspection ————trees are seen to be existing. In view of this, you are required and, therefore, informed to plant ———additional trees within your plot/ at location of ———— within/ at location————within 90 days from the date of this order.

You are also informed to give compliance report of this order forthwith. You are also requested to furnish undertaking specifying that the trees planted under these orders will be maintained properly. Non-compliance of the said order shall attract the penalty of Rs.5,000 per tree, which may please be noted. Further, on failure of the same, necessary legal action would be initiated as per the provisions of the said Act.

Yours faithfully,

(Sign)

Tree Officer.

(Seal of the Tree Authority)

## FORM – "G"

### Section 9 (2)

Date :

**Format for report of compliance to be submitted by the owner/occupier of the land as required under Sec.8/9/10.**

| Date of order of Tree Officer under Sec.9 (1) | No.of trees required as per specifications as stipulated in Sec.7(*c*) & Sec.10(*1*) & in the order under Sec.9(*1*) | Number of existing trees | Number of trees required to be planted | Place of plantation | Compliance by owner | | | | Date of compliance | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | No.of trees trans-planted | No.of trees addition-ally planted | No.of trees existing | Total No.of trees | | |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) | (9) | (10) | (11) |

I hereby take the responsibility to maintain these trees till they are formally established. The trees planted as above are being well maintained.

Name & signature of the owner/occupier.

Plot No./S.No.

Location –

Ward No.

## FORM –"H"

### Notice

**(Under Sec.10(1) read with Sec.7(*c*) of the Maharashtra (Urban Areas) Protection & Conservation of Trees Act, 1975).**

**Sub** : Destructions/fall of trees on C.T.S.No._____________
owned by ____________________________________.

At the time of site inspection, the staff of the undersigned has noticed that__________trees are fallen or destroyed by wind/ fire/ lightening/ torrential rain. Due to this act, __________number of trees are deficient on your plot as per Sec.7(*c*) of the Maharashtra (Urban Areas) Protection & Conservation of Trees Act, 1975.

You are, therefore, required to plant__________number of trees within plot within 90 days from the date of this Notice. If you have any say/objection against this Notice, you can file your say/objection on or before___________ before the undersigned. If you fail to file your say/objection accordingly this Notice shall be treated as final order under Sec.10(*1*) of the Act.

Tree Officer.

To,

____________________

____________________

## FORM –"I"

### Terms & Conditions under Section 12

**(To be specified in the Agreement to be executed on Rs.20 stamp paper)**

Adoption of trees shall be governed by following terms and conditions.

1. The trees shall be properly maintained.
2. The Institution/Company/Trust/Individual shall be solely responsible for the maintenance and conservation of adopted trees.
3. No tree less than one year old shall be given for adoption.
4. The Institution shall give undertaking stating that all terms and conditions shall be observed during period of adoption.

| Applicant | Details of trees to be adopted | | | | Period of adoption |
|---|---|---|---|---|---|
| | Number | Type | Approximate age | Location | |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |
| Individual/Corporate Body/Institution/ Trust/Company | | | | | |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

N. R. SHENDE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT PRESS, CIVIL LINE, NAGPUR 440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004.